सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १३ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# भारतीय वायू दलाचे ‘एएन-३२’ विमान कोसळले

## ५ जवानांचा मृत्यू, सह- वैमानिक गंभीर जखमी





स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंग | फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार | सार्जंट जितेंद्र शर्मा | अनिवीर खेमरम कुमावत | अग्रिवीर दानिश आलम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ जोरहाट आसाम** - आसाममधील जोरहाट येथे भारतीय वायू दलाच्या ‘एएन-३२’ या विमानाचा शनिवारी सकाळी अपघात झाला. या अपघातात वायू दलाच्या पाच जवानांचा मृत्यू झाला आहे. तर एक सह-वैमानिक गंभीर जखमी झाला आहे. सह-वैमानिकावर सध्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ‘एएन-३२’ हे भारतीय वायू दलाचे विमान जोरहाट येथील लष्करी तळावर उतरत असताना अपघातग्रस्त झाले.

### भारतीय वायू दलाकडून ‘कोर्ट ऑफ इन्क्वायरी’चे आदेश

या अपघाताप्रकरणी भारतीय वायू दलाने ‘कोर्ट ऑफ इन्क्वायरी’चे आदेश दिले आहे. अपघात का झाला याचे नेमके कारण तपासण्यासाठी हे आदेश देण्यात आले आहेत. विमानाला आग का लागली याचा तपास यंत्रणा शोध घेत आहेत.

प्राथमिक अहवालानुसार, विमान लँड होत असताना त्याला आग लागली. विमानाला आग लागल्यानंतर एअरबेसमधील आपात्कालीन सुविधा पुरवणाऱ्या यंत्रणांनी विमानाच्या दिशेने धाव घेतली. भारतीय वायू दलाचे ‘एएन-३२’ हे माल वाहतूक करणारे विमान दुर्घटनाग्रस्त झाल्याची माहिती भारतीय वायू दलाने ‘एक्स’वर केलेल्या पोस्टमध्ये दिली.

भारतीय वायू दलाने ‘एक्स’वरील पोस्टमध्ये अपघाताबाबत माहिती दिली आहे. आसाममधील जोरहाट येथे झालेल्या विमान अपघातात ५ जवानांचा मृत्यू झाला आहे. भारतीय वायू दल या अपघाताबाबत तीव्र वेदना व्यक्त करते. स्काड्रन लिडर प्रशांत सिंग, फ्लाइट लेफ्टिनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्नीवीरवायू खेमाराम कुमावत आणि अग्नीवीरवायू दानिश आलम यांनी कर्तव्य निभावताना सर्वोच्च बलिदान दिले आहे. या दु:खद प्रसंगी भारतीय वायू दल जवानांच्या कुटुंबियांसोबत असून तीव्र संवेदना व्यक्त करते, असे ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# शिर्डीला देवदर्शनाला जाताना काळाचा घाला!

## कंटेनरने दुचाकीला पाऊण किलोमीटर फरफटत नेलं, ३० वर्षीय डॉक्टरसह तिघांचा दुर्दैवी अंत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३गंगापूर-** गंगापूर-भेंडाळा फाटा -छत्रपती संभाजीनगर महामार्गावर बाबरगाव फाट्याजवळ शनिवारी (ता. १३) सकाळी दहा ते सवा दहा वाजेच्या दरम्यान कंटेनर व दुचाकीच्या धडकेत तिघांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीवरील दोघांसह कंटेनर चालकाचा समावेश आहे.

याबाबत माहिती अशी की, संभाजीनगरकडून भेंडाळा फाटा-गंगापूर मार्गे शिर्डी येथे देवदर्शनास जाणाऱ्या स्कुटी क्रमांक चक २० : क्ण ४४०७ ला समोरून येणाऱ्या कंटेनर क्रमांक घ- ५६ :८७६८ ने जोराची धडक देत लांब फरफट नेले. दुचाकीचा अक्षरशः चुराडा झाला, तर कंटेनर पलटी होऊन त्याचे मोठे नुकसान झाले.

स्कुटीवरील डॉ. महादेव चंद्रकांत घुले (वय ३० रा. जालना) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत असलेल्या मीरा कडूबा पांडव (वय २३ रा. गुंडेवाडी ता. जि. जालना) या गंभीर जखमी झाल्या होत्या. अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक शूभम वाघमारे व सागर शेजूळ यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना मीरा पांडव यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, हैद्राबादला माल घेऊन जाणारा कंटेनर कर्नाटकातील मंगलगी जि. बिदर येथील कंटेनर चालक राजकुमार देवेंद्र अप्पा (वय ४६) यांचाही अपघातात मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलीस रिझवान शेख, प्रकाश सातपुते, विष्णू बापते यांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. या प्रकरणी गंगापूर पोलिस ठाण्यात नोंद झाली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# विधान परिषद निवडणुकीत नवा ट्विस्ट!

## चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पॅनेलची घेतली भेट



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नागपूर :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या पाठिंब्याने बुटीबोरी नगर परिषदेत सत्ता मिळवलेल्या परिवर्तन पॅनेलच्या पदाधिकाऱ्यांसोबत नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या बैठकीमुळे विधान परिषद निवडणुकीच्या राजकारणाला नवा ट्विस्ट मिळाला आहे.

**भाजपच्या मताधिक्याच्या रणनीतीला बळ**

विधान परिषद निवडणुकीत भाजपकडे विजयासाठी आवश्यक संख्याबळ असल्याचे मानले जात असले तरी पक्षाने मताधिक्य वाढविण्यासाठी स्वतंत्र प्रयत्न सुरू केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांशी संपर्क साधून व्यापक पाठिंबा मिळविण्याची रणनीती भाजपने आखल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर बुटीबोरीतील परिवर्तन पॅनेलशी वाढलेला संवाद राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे. सहा महिन्यांपूर्वी नगर परिषद निवडणुकीत भाजपला पराभूत करणाऱ्या याच आघाडीची भूमिका आता उत्सुकतेचा विषय ठरत आहे.

**बावनकुळे यांच्या उपस्थितीत खलबते**

गुरुवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नगर परिषदेचे सभापती अमजद शेख यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. या बैठकीस आमदार समीर मेघे, डॉ. राजीव पोतदार, नगराध्यक्ष सुमित मेंढे, उपाध्यक्ष आकाश वानखेडे, माजी नगराध्यक्ष बबलू गौतम, नगरसेवक समीर बोरकुटे, नगरसेविका करिश्मा भुमरकर यांच्यासह अन्य नगरसेवक उपस्थित होते. बैठकीतील चर्चेचा तपशील अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेला नसला तरी तिचा संबंध आगामी विधान परिषद निवडणुकीशी जोडला जात आहे.

नगर परिषद निवडणुकीत भाजपविरोधी भूमिका घेऊन सत्तेवर आलेल्या परिवर्तन पॅनेलकडून आता भाजपला पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने विरोधी पक्षांच्या गोटात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी बावनकुळे आणि परिवर्तन पॅनेलच्या नेत्यांमधील भेटीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या घडामोडींमुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची नांदी मिळाल्याचे मानले जात असून आगामी काही दिवसांत या हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अजितदादांप्रमाणेच एकनाथ शिंदेंचाही घात होऊ शकतो



### शिवसेना पदाधिकाऱ्याचे खळबळजनक वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३पंढरपूर**


शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचे पंढरपूरमध्ये सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला आता कमालीचे राजकीय वळण मिळाले आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी आणि माळशिरस तालुक्याचे पंचायत समिती सभापती दत्तात्रय मगर यांनी थेट आंदोलनस्थळी जाऊन रोहित पवारांना पाठिंबा जाहीर केला. मात्र, यावेळी बोलताना त्यांनी अजितदादांप्रमाणेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचाही घात होऊ शकतो, असे अत्यंत खळबळजनक वक्तव्य केल्याने महायुतीसह संपूर्ण राज्यभरात मोठी खळबळ उडाली आहे.

शिंदे गटाचे अधिकृत पदाधिकारी असूनही दत्तात्रय मगर यांनी थेट आपल्याच सरकारमधील मित्रपक्षांवर संशय व्यक्त केला आहे. आंदोलनस्थळी बोलताना मगर म्हणाले, मी सध्या सत्ताधारी सरकारमध्ये आहे, हे मान्य आहे. पण अजितदादांसोबत काय झाले, हे आज संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. शेतकऱ्यांचा एक मोठा कैवारी असणारे अजित पवार आपल्यामधून कसे हिरावले गेले, हे सर्वांनी पाहिले आहे. आता आपल्याला या दुसऱ्या कैवाऱ्याला (रोहित पवार) जपायचे आहे. मला सर्वात मोठी खंत वाटते ती म्हणजे आपले नेते एकनाथ शिंदे साहेबांची! अजितदादा जसे गेले, तसेच शिंदे साहेबांचाही अंतर्गत राजकीय घातपात केला जाऊ शकतो, अशी दाट शक्यता मला वाटतेय.

सत्ताधारी पक्षाच्या एका जबाबदार पदाधिकाऱ्याने उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेबाबत आणि राजकीय भविष्याबद्दल थेट जाहीर मंचावरून अशी शंका उपस्थित केल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

# २३-२४ जून विठ्ठल मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद

## विठुरायाच्या मूर्तीवर होणार विशेष संवर्धन प्रक्रिया



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३पंढरपूर-** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पंढरपूरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर २३ आणि २४ जून रोजी सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे.

विठ्ठलाच्या मूर्तीची झीज रोखण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून (ASI) विशेष संवर्धन आणि लेपन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. मंदिर प्रशासनाने देशभरातील वारकरी, भाविक आणि पर्यटकांना या दोन दिवसांत पंढरपूरला दर्शनासाठी येऊ नये, असे आवाहन केले आहे.

२२ ते २४ जूनदरम्यान मूर्तीवर विशेष लेपन

श्री विठ्ठलाच्या मूर्तीची नैसर्गिक झीज वाढत असल्याचे निरीक्षण समोर आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समिती, वारकरी प्रतिनिधी आणि पुरातत्त्व विभागाची बैठक झाली होती.

या बैठकीत मूर्तीचे पारंपरिक की रासायनिक पद्धतीने संवर्धन करायचे यावर सविस्तर चर्चा झाली.

अखेरीस तज्ज्ञांच्या शिफारशींनुसार २२ ते २४ जूनदरम्यान रासायनिक पद्धतीने मूर्तीवर संरक्षक लेपन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

माहितीनुसार, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पायाजवळ झीज होऊन खड्ड्यासारखा भाग निर्माण झाला आहे. तसेच इतर काही भागांमध्येही झीज झाल्याचे निदर्शनास आले आहे.यासाठी मूर्तीच्या मूळ दगडाशी सुसंगत दगडी पावडर आणि विशेष सेंद्रिय रसायनांचा वापर करून झिजलेल्या भागांची दुरुस्ती केली जाणार आहे. यासोबतच मूर्तीचे आयुष्यमान वाढावे यासाठी संरक्षक आवरण देखील दिले जाणार आहे.

# संजय राऊत सांगतील अन् खातेवाटप होईल का?

## छगन भुजबळांचा टोला, राज्यसभा उमेदवारीवरही सोडलं मौन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई** राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडी आणि मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेत विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. अजित दादांचे अर्थखाते आता मुख्यमंत्री चांगले सांभाळत आहेत, या संजय राऊत यांच्या विधानाचा समाचार घेताना, खातेवाटपाबाबत काय राऊतांशी बोलून निर्णय घ्यायचे का? असा खोचक टोला भुजबळांनी लगावला. तसेच, राज्यसभेची उमेदवारी न मिळाल्याबाबत पक्षीय पातळीवर काय घडामोडी झाल्या, यावरही त्यांनी जाहीर भाष्य केले.

**खातेवाटपाचा निर्णय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा-** संजय राऊत यांच्या टीकेला उत्तर देताना छगन भुजबळ म्हणाले, संजय राऊत सांगतील आणि त्याप्रमाणे खातेवाटप होईल असे कसे होईल? खातेवाटपाबाबत आता काय राऊतांशी बोलावे लागेल का? राज्यातील खातेवाटपाबाबत जे काही निर्णय आहेत, ते सर्वस्वी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मिळून घेतलेले आहेत. त्यामुळे त्यात इतरांनी ढवळाढवळ करण्याची गरज नाही.या पत्रकार परिषदेत भुजबळ यांनी राज्यसभेच्या उमेदवारी बाबत पडद्यामागे काय घडले, याचा खुलासा केला. मी स्वतः राज्यसभेवर जाणार होतो. मात्र, मी जात असताना इतर मुलांना (तरुण नेत्यांना) देखील संधी मिळाली पाहिजे, हा विचार पुढे आला. त्यामुळे मी पक्षाकडे प्रस्ताव ठेवला होता की, माझ्या मुलांनाही संधी द्या; इथे समीर भुजबळ यांना राज्य सरकारमध्ये मंत्रीपद द्या आणि मी दोन वर्षांसाठी राज्यसभेवर जातो. परंतु, शेवटी पक्षाने जो निर्णय घेतला तो आम्हाला मान्य आहे, असे भुजबळ म्हणाले. पक्षाने घेतलेल्या निर्णयानुसार राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांना राज्यसभेवर जाण्याची संधी मिळाली आहे. ज्यांना संधी मिळाली ते आता गेले आहेत, पक्षाचा निर्णय अंतिम असतो, असे म्हणत त्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

## संपादकीय ......

# दादांनंतर वहिनीच हायकमांड

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचा २७ वा वर्धापन दिन मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात नुकताच पार पडला. या सोहळ्यात पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे भाषण जोरदार झाले. पक्षात राहूनच पक्षाला वेठीस धरणार्या नेत्यांना सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणातून चांगलेच खडेबोल सुनावले. पक्षात शिस्तभंग, गटबाजी किंवा पक्षाची प्रतिमा मलिन करणार्या कोणत्याही प्रकाराला यापुढे थारा दिला जाणार नाही. पक्षात कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप सहन करणार नाही, असे म्हणत त्यांनी पक्षाची सूत्रे आपल्या हाती असून पक्षनेतृत्वाचा निर्णय मान्य करावाच लागेल, असा संदेश दिला. नेत्यांनी पक्षात किती वर्षे काम केले यापेक्षा पक्षावाढीसाठी काय योगदान दिले? एवढी वर्षे पक्षात राहून पक्ष मोठा केला का स्वत:च मोठे होण्याचा प्रयत्न केला? याचेदेखील परीक्षण केले जाईल, असे म्हणत त्यांनी जुन्या जाणत्या नेत्यांना पक्षात रहायचे असेल तर पदाची अपेक्षा न ठेवता काम करण्यावाचून पर्याय नाही, असा अप्रत्यक्ष इशारा दिला. पक्षाची सूत्रे हाती घेतल्यापासून सुनेत्रा पवार यांनी पहिल्यांदाच असे रोखठोक भाषण केल्याने त्यांच्यात अजितदादांच्या कणखरपणाची झलक दिसून आली.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविना पार पडलेला पक्षाचा हा पहिलाच वर्धापन दिन सोहळा. या वर्धापन दिनाला पक्षाची तमाम नेतेमंडळी हजर असली, तरी सभागृहात दादांची उणीव प्रकर्षाने जाणवत होती. म्हणूनच सभागृहातील व्यासपीठावर त्यांच्या नावाची एक रिकामी खुर्ची उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. सत्तेत असो वा नसो अजित पवार सतत चर्चेत असलेले व्यक्तिमत्व होते. रांगड्या स्वभावाच्या अजितदादांना गावखेड्यातील प्रश्नांपासून ते शहरी नागरी समस्यांची उत्तम जाण होती, प्रशासनावर विलक्षण पकड होती. त्यामुळे ते एक लोकप्रिय, अनुभवसंपन्न आणि जनहिताच्या प्रश्नाला प्राधान्य देणारे नेते होते. समोरच्याचे काम होत असेल तर करणारच आणि होत नसेल तर त्याला नाही म्हणून तोंडावर सांगणारा त्यांच्यासारखा परखड व्यक्तिमत्वाचा दुसरा नेता दुसरा नव्हता. धारदार आवाजाच्या अजितदादांचे सडेतोड बोलणे आणि त्यांची भाषणशैली सामान्य कार्यकर्त्याच्या काळजाचा ठाव घेणारी होती. प्रत्येक कार्यकर्त्याशी त्यांचा वन टू वन संवाद असायचा. अशा रोखठोक स्वभावाच्या अजितदादांचा पक्षातील सर्वच नेत्यांवर वचक होता. मात्र, अजितदादांच्या निधनानंतर हा वचक एकाएकी नाहीसा झाल्याचे जाणवत होते. मोठ्या साहेबांचा हात सोडून पक्षातील नव्याजुन्या नेतेमंडळींनी अजितदादांना साथ दिली होती. परंतु त्यांच्या जाण्याने या सर्वच नेत्यांना आपल्या भविष्याची चिंता वाटू लागली. हे तेच नेते होते ज्यांनी अजितदादांना शरद पवारांसारख्या वटवृक्षाच्या छत्रछायेतून बाहेर काढत स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व शोधायला प्रवृत्त केले होते.

पक्ष विभाजनानंतर या सर्वच नेत्यांना सत्तेची गोड फळे चाखता आली. परंतु अजितदादांच्या निधनाने सत्तापदांच्या फळांची टोपली आपल्या हाती राहते की नाही असे प्रश्न उपस्थित झाले. पक्ष टिकतो की नाही इथपासून ते दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार की नाही? अशा प्रश्नांनी राष्ट्रवादीचे नेते आणि कार्यकर्त्यांना गोंधळात टाकले. दोन्ही गटांचे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असताना अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. यानंतर पक्षाच्या अध्यक्षाही झाल्या. परंतु, पक्षातील काही ज्येष्ठ नेतेच पक्षाचा गाडा हाकत असल्याची, महत्त्वाचे सर्व निर्णय घेत असल्याची चर्चा काही दिवसांपर्यंत दबक्या आवाजात सुरू होती. त्यातच अजित पवारांचे चिरंजीव पार्थ आणि जय यांचे वरिष्ठ नेत्यांसोबतच्या खडाखडीचे किस्से बाहेर येत होते. तर कधी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या यादीत ज्येष्ठ नेत्यांच्या नावापुढे त्यांचे पद नमूद नसणे, पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकांना ज्येष्ठ नेते गैरहजर असणे यामुळे मागच्या काही दिवसांत शंकाकुशंकांना उधाण आले होते.

कधीकाळी राजा गेल्यानंतर त्यांच्या वारसाला गादीवर बसवून इतर सरदार, मंत्रीसंत्री राज्यकारभार हाकायचे, त्यांच्या नावाने लढाया लढायचे आणि हाती येणार्या खजिन्यावरही ताव मारायचे. असे सारेकाही घडत असताना आपल्या हाती एकवटलेल्या सत्तेला कुणीही नख लावू नये याची काळजीही ते घ्यायचे. यासाठी तख्तावर बसलेल्या वारसाचे पंख छाटण्यापासून त्याच्याविरुद्ध कटकारस्थान रचण्यातही ते मागेपुढे पाहायचे नाही. तसेच काहीसे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडते आहे की काय? पक्षाची सूत्रे हाती घेण्यावरुन पक्षांतर्गत धुसफूसीच्या चर्चा या ना त्या बहाण्याने बाहेर येत होत्या. त्या सार्यांना सुनेत्रा पवार यांच्या एका भाषणाने लगाम लावला आहे. देशातल्या प्रादेशिक पक्षांचा आजवरचा इतिहात पाहता घराणेशाहीविना या पक्षांचे अस्तित्व शून्य असल्याचे दिसून येते. समाजवादी पक्ष, शिवसेनेसोबत राष्ट्रवादी काँग्रेसही त्याच माळेतला पक्ष. भलेही या पक्षाची दोन शकले झाली असली, तरी या माळेला एकत्रित गुंफण्याचे काम पवार कुटुंबातील व्यक्तीशिवाय दुसरी कुठलीही व्यक्ती करु शकत नाही हेदेखील वास्तव आहे.

जसे काँग्रेसमध्ये गांधी घरण्यातील व्यक्तीच हायकमांड असते. अगदी तसेच. सध्या पक्षातील काही नेत्यांकडे अनेक सत्तापदे एकवटलेली आहेत. एकाच घरात खासदारकी, आमदारकी आणि मंत्रीपदही, त्यावरुन ज्येष्ठ नेत्यांमध्ये कुरबुरी सुरू आहे. त्यांना इतकी सत्तापदे तर मला काही नाही, मीदेखील पक्षासाठी इतकी वर्षे घासली आहेत? असे प्रश्न हे ज्येष्ठ नेते जाहीररित्या विचारत आहेत. परंतु हे प्रश्न विचारताना आपण व आपल्या कुटुंबातील सदस्यांनी किती वर्षे सत्ता उपभोगली याचा मात्र त्यांना विसर पडताना दिसतोय. या सार्याच नेत्यांना सुनेत्रा पवार यांनी अप्रत्यक्षरित्या झापले. अजितदादांच्या निधनानंतर संक्रमणावस्थेतून जात असलेल्या राष्ट्रवादीत खरा हायकमांड कोण आहे हे सुनेत्रा पवारांनी दाखवून दिले आहे. आता या हायकमांडला पक्ष सुरळीत चालवायचा असेल तर सर्व नेतेमंडळींवर मजबूत कमांड ठेवावी लागणार आहे.

# ग्राहकांचे फोन उचला, वीज समस्या तातडीने सोडवा; महावितरण संचालकांचे कडक निर्देश

### पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्तक्षेपानंतर तातडीची व्हिडिओ कॉन्फरन्स

**तक्रारींकडे दुर्लक्ष खपवून घेतले जाणार नाही**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती,**

वीज ग्राहकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद देऊन त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. ग्राहकांचे फोन न उचलणे अथवा तक्रारींकडे दुर्लक्ष करणे यापुढे सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा महावितरणचे संचालक (संचालन) सचिन तालेवार यांनी दिला.अमरावती जिल्ह्यातील वीज समस्यांची गंभीर दखल घेत पालकमंत्री उहरपवीरीहशझहरी इुरपर्झीश्रश यांनी संचालक (संचालन) यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर सचिन तालेवार यांनी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक सांळुंके, अधीक्षक अभियंते आणि सर्व कार्यकारी अभियंत्यांची तातडीची व्हिडिओ कॉन्फरन्स घेऊन वीज सेवा अधिक प्रभावी करण्याबाबत सूचना दिल्या.यावेळी बोलताना तालेवार यांनी वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा देणे ही महावितरणची जबाबदारी असल्याचे सांगितले. ग्राहकांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवून त्यांच्या समस्या तत्काळ जाणून घेऊन निराकरण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.नियोजित देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी सकाळी




७ ते ११ या वेळेतच वीजपुरवठा बंद ठेवावा. तसेच वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी संबंधित ग्राहकांना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.वीज बिलासंदर्भातील तक्रारी सोडविण्यासाठी स्थानिक पातळीवर विशेष शिबिरे आयोजित करून त्यांचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. तसेच महावितरणच्या नियंत्रण कक्षासह लाईनमन, शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांनी ग्राहकांच्या दूरध्वनीला प्रतिसाद देणे बंधनकारक असल्याचे सांगत ग्राहकसेवेत कोणतीही हयगय सहन केली जाणार नसल्याचा इशारा तालेवार यांनी दिला.

# कोरड्या विहिरीत साठवले बोरवेलचे पाणी; शेतकऱ्याच्या जुगाडने वाचली पिक

### मालधुर शिवारातील शेतकऱ्याचा अभिनव प्रयोग; ठिबक सिंचनातून पाण्याचा काटकसरीने वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३चांदुर रेल्वे,**

उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे चांदुर रेल्वे तालुक्यातील मालधुर शिवारातील अनेक शेतांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत एका शेतकऱ्याने कोरड्या पडलेल्या विहिरीचा उपयोग पाणीसाठा करण्यासाठी करून पिके वाचवण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे.शेतकऱ्याने बोरवेलमधील पाणी कोरड्या विहिरीत सोडून त्याची साठवण




केली आहे.

साठवलेले हे पाणी केवळ शेतीच्या उपयोगासाठी असून ठिबक सिंचन, फवारणी आणि अन्य कृषी कामांसाठी वापरले जात आहे. पिण्याच्या पाण्यासाठी त्याचा वापर केला जात नसल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले.उन्हाच्या तीव्रतेमुळे पिके करपण्याची वेळ आली असताना या साठवलेल्या पाण्यामुळे उभी पिके तग धरून आहेत. कमी पाण्यात अधिक क्षेत्राला सिंचन देण्यासाठी ठिबक पद्धतीचा वापर करण्यात येत असून त्यामुळे पाण्याचा अपव्ययही टाळला जात आहे.शेततळे योजना, जलसंधारणाची संकल्पना आणि शेतकऱ्याचे नियोजन यामुळे हा प्रयोग यशस्वी ठरला आहे. पाण्याची कमतरता असतानाही उपलब्ध स्रोतांचा योग्य वापर करून शेती वाचवण्याचा हा प्रयत्न इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून तालुक्यात त्याची चर्चा रंगली आहे.

# जनगणना अभियानात पहिल्या टप्प्याचे १०० टक्के काम पूर्ण

### महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या हस्ते अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या जनगणना अभियानाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण झाल्याबद्दल आज शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या हस्ते संबंधित झोनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.जनगणना अभियान यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या झोन क्र.१ चे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, उपअभियंता आशिष अवसरे व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा, झोन क्र. ४ चे सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा, झोन क्र. ५ चे सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे, उपअभियंता विवेक देशमुख व त्यांच्या कर्मचारीवर्गाचा तसेच झोन क्र.३ चे उपअभियंता नितीन भटकर यांचा यावेळी गौरव करण्यात आला.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी जनगणना अभियान यशस्वी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. जनगणना ही शहराच्या विकास आराखड्यासाठी महत्त्वाची प्रक्रिया असून सर्वांनी समन्वयाने काम करून अभियान शंभर टक्के पूर्ण केले, ही अमरावती महानगरपालिकेसाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच जनगणना अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त योगेश पिठे यांचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि समन्वयामुळे अभियान निर्धारित वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.सत्कार समारंभात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. उपस्थितांनीही जनगणना अभियानाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत पुढील शासकीय उपक्रमांमध्येही अशीच कार्यक्षमता दाखविण्याचा निर्धार व्यक्त केला.याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त योगेश पीठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नितीन बोबडे, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, सहाय्यक शहर जनगणना अधिकारी अक्षय निलंगे, कैलास कुलट, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# तंटामुक्त समिती पुनरुज्जीवित करा

### गावपातळीवरील सामोपचार यंत्रणा निष्क्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती** – ग्रामीण भागात सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेली महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम एकेकाळी अत्यंत प्रभावी लोकसहभागी उपक्रम म्हणून ओळखली जात होती. मात्र, गेल्या काही वर्षांत या मोहिमेची धार कमी झाल्याने गावपातळीवर सोडविले जाणारे अनेक वाद आता थेट पोलिस ठाणे, तहसील कार्यालय आणि न्यायालयांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे तंटामुक्त समिती पुनरुज्जीवित करण्याची मागणी होत आहे.



तंटामुक्त समित्यांमुळे जमीन-वाटप, हद्दविवाद, कौटुंबिक मतभेद, शेजारकीचे वाद, पाणीवाटप तसेच सार्वजनिक सुविधांशी संबंधित प्रश्न सामोपचाराने निकाली निघत होते. त्यामुळे न्यायालयांवरील ताण कमी होण्यासह सामाजिक ऐक्यही मजबूत होत होते. सध्या अनेक गावांमध्ये समित्या केवळ कागदोपत्री अस्तित्वात असून बैठका, प्रशिक्षण आणि नियमित मूल्यमापनाचा अभाव जाणवत आहे.

त्यातच सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे किरकोळ गैरसमज आणि आक्षेपार्ह पोस्टमुळे गावागावांत तणाव निर्माण होण्याचे प्रकार वाढले आहेत. शांतताप्रिय गावांमध्येही सोशल मीडियावरील अफवा, दिशाभूल करणाऱ्या पोस्ट व वैयक्तिक टीकाटिप्पणीमुळे वाद निर्माण होत असल्याची ग्रामस्थांची भावना आहे.

# महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांची विविध ठिकाणी नाल्यांची पाहणी

### अमरावतीकरांना नाल्यात कचरा न टाकण्याचे आवाहन

### पावसाळी तयारीचा आयुक्तांकडून आढावा; नाले स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिक व हॉकर्सना सहकार्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**– आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील जलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनाने तयारीला वेग दिला असून, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील विविध भागांतील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेल्या स्वच्छता व गाळ काढण्याच्या कामांचा आढावा घेतला.

यावेळी आयुक्तांनी नमुना गल्ली, अंबानाला, भुतेश्वर चौक, पन्नालाल नगर, समाधान नगर व मालवीय चौक परिसरातील नाल्यांची पाहणी केली. पावसाळ्यात पाणी साचण्याची शक्यता असलेले भाग, नाल्यांची वहनक्षमता, गाळ काढण्याची प्रगती तसेच पावसाचे पाणी सुरळीतपणे वाहून जाण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली.पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये साचलेला गाळ, प्लास्टिक, कचरा व इतर अडथळे आढळून आले. या अडथळ्यांमुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडचणी निर्माण होऊन जलभरावाची समस्या उद्भवू शकते, असे आयुक्तांनी नमूद केले. ज्या ठिकाणी कामे अपूर्ण आहेत किंवा अतिरिक्त उपाययोजनांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.आयुक्त वर्षा लड्डा यांनी अमरावतीकरांना आवाहन करताना सांगितले की, नाले, गटारे व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये. अनेक वेळा घरगुती कचरा, प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल, बांधकाम साहित्य तसेच व्यावसायिक आस्थापनांचा कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो. त्यामुळे नाल्यांचा प्रवाह अडथळित होऊन



पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्या निर्माण होतात.विशेषतः शहरातील हॉकर्स, फेरीवाले, व्यावसायिक प्रतिष्ठानधारक तसेच नागरिकांनी नाल्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा कचरा टाकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. शहर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासनास नागरिकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नमुना गल्ली आणि अंबानाला परिसरात नाल्यांची स्थिती तपासताना आयुक्तांनी पावसाचे पाणी अडथळ्याविना वाहून जाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती घेतली. भुतेश्वर चौक परिसरातील जलनिस्सारण व्यवस्थेची पाहणी करताना पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. तसेच पन्नालाल नगर येथील नाल्यांच्या स्वच्छतेची पाहणी करून संबंधित विभागाला नियमित देखरेख ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना संबोधित करताना आयुक्तांनी पावसाळी कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. नाल्यांमधील गाळ काढण्याची कामे अधिक प्रभावीपणे राबविणे, कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे तसेच नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महानगरपालिकेकडून शहरातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या पावसाळी कामांचा नियमित आढावा घेतला जात असून, प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे कामांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिका प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.यावेळी उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता सुहास चव्हाण, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, उपअभियंता दिनेश हंबर्डे, अभियंता लक्ष्मण पावडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.स्वच्छ नाले, सुरक्षित अमरावती हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने नाल्यांमध्ये कचरा टाकणे टाळावे. हॉकर्स, व्यावसायिक प्रतिष्ठानधारक व नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाला सहकार्य करून शहर जलभरावमुक्त ठेवण्यासाठी आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन आयुक्त वर्षा लड्डा यांनी यावेळी केले.

# मोर्शी तालुक्यात गारपीट, संत्र्याचे मोठे नुकसान

## हिवरखेड महसूल मंडळात सर्वाधिक नुकसान !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मोर्शी** मोर्शी तालुक्यात शुक्रवार १२ जून रोजी ४ वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस व जोरदार गारपिट झाल्यामुळे मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, आधीच नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादनखर्च आणि बाजारातील अनिश्चिततेचा सामना करणारा शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे. विशेषतः हिवरखेड महसूल मंडळातील दापोरी डोंगर यावली,घोडदेव, सालबर्डी पाळा मायवाडी भाईपूर यासह अनेक गावांमध्ये गारपिटीचा सर्वाधिक फटका बसला असून संत्रा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अनेक ठिकाणी संत्र्यांची फळगळ झाली असून झाडांवरील फळांना गंभीर इजा पोहोचली आहे. काही भागांत गारपिटीमुळे झाडांच्या फांद्या तुटल्या असून आगामी हंगामावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हजारो रुपयांचा खर्च करून संत्रा बागांचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याने आणि पिक विमा कंपन्यांकडूनही अपेक्षित मदतन मिळाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे



सर्वेक्षण करून पंचनामे करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की, गारपिटीमुळे संत्राउत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.महसूल व कृषी विभागाने संयुक्तपणे तात्काळ पंचनामे करून वस्तुनिष्ठ नुकसान अहवाल शासनाकडे सादर करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत, विशेष अनुदान आणि विमा भरपाई देण्यात यावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या भावना तीव्र होऊन आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.हिवरखेड महसूल मंडळासह परिसरातील गावांमध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची अपेक्षा व्यक्त केली असून, केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष मदत मिळावी अशी मागणी होत आहे. गारपिटीमुळे उद्ध्वस्त झालेल्या संत्रा उत्पादकांना तातडीचा दिलासा देण्यासाठी शासनाने विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही जोर धरत आहे.

# वृद्धाची १३.८७ लाखाने ऑनलाईन फसवणूक

## सायबर गुन्हेगारांची टोळी अटकेत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१३अमरावती–** एका वृद्धा कडुन १३ लाख ८७ हजार रुपयांनी ऑनलाईन फसवणूक करणार्या तीन आरोपींना अमरावती पोलिसांनी नोएडा येथून अटक केली. हे तिघेही आंतराज्यीय सायबर गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. स्थानिक सक्करसाथ येथील ६७ वर्षीय सुधीर बालक्रिष्ण भंडारी यांनी ६ वर्षापूर्वी आदित्य बिरला फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते व त्याची पूर्ण परतफेड सुद्धा केली होती. गत ४ जानेवारी रोजी रोजी अज्ञात मोबाईलवर एका व्यक्तीने तो आदित्य बिरला फायनान्स कंपनीचा प्रतिनिधी बोलत असल्याचे सांगून ३० लाख रुपयांचे कर्ज पुन्हा मंजूर झाल्याचे भंडारी यांना सांगितले. त्याने सांगितल्याप्रमाणे भंडारी यांनी स्वतःचे आधारकार्ड, पॅन कार्ड व जीएसटीएन सर्टीफिकेट, एक कॅन्सल चेक व्हॉट्सॲपद्वारे पाठविले होते.कागदपत्रे पाठविल्यानंतर त्या अज्ञात इसमाने कर्ज प्रक्रियेकरिता ७५ हजार रुपये भरावे लागतील व कर्ज मंजुरीकरिता अधिकार्ययास पैसे द्यावे लागतील असे सांगितले. त्यानंतर वेगवेगळ्या वेळी मोबाईलधारकांने ३० लाख रूपये लोन देण्याचे आमिष दाखवून भंडारी यांना एकूण १३ लाख ८७ हजार ७०० रुपये पाठविण्यास भाग पाडून ऑनलाईन आर्थिक फसवणूक केली. ही बाब लक्षात आल्यावर भंडारी यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी सायबर विभागाच्या मदतीने या प्रकरणातील आरोपी नोएडा, उत्तर प्रदेश या भागातील असल्याचे निष्पन्न केले. या गुन्ह्यातील बँक खाते नोएडा येथील असल्याने सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार, हेड कॉन्स्टेबल निखिल माहुरे, कॉन्स्टेबल अश्विन यादव व रोशन लकडे यांचे पथक दिल्ली येथे रवाना झाले. ज्याच्या बँक खात्यावर फसवणुकीची रक्कम जमा झाली होती, पोलिसांनी त्या कमलेश दाताराम शर्मा यास स्थानिक पोलिसांच्या मदतीने नोएडा येथून न मोठ्या शिताफीने व व्यावसायिक कौशल्य दाखवून ताब्यात घेतले. त्याने चौकशी दरम्यान त्याच्या नावावर असलेले बँक खाते नोएडा येथीलच राहूल ठाकूरप्रसाद पांडे व छोटलाल कल्लू यांना वापरायला दिले असल्याचे सांगितले. त्या दोघांनाही अटक करण्यात आली. हे सर्व आरोपी सायबर गुन्हे करणार्या आंतरराज्यीय टोळीतील सदस्य असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांची पोलिस कोठडी घेण्यात आली आहे.

ही कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार यांच्या नेतृत्वात निखिल माहुरे, उल्हास टवलारे, नरेंद्र उघडे, अश्विन यादव, रोशन लकडे, अनिकेत वानखडे, करण बोरकुटे, बाळू पालवे, सुषमा आठवले, सपना साखरे यांनी केली.

# चिखलदरा येथे महिला बचत गटांसाठी पेपर प्लेट व द्रोण निर्मितीचे प्रशिक्षण



## पाणीअभावी व्यवस्थेवर नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ चिखलदरा**
मेळघाटातील तीव्र पाणीटंचाईचा फटका आता विविध शासकीय व स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांनाही बसू लागला आहे. चिखलदरा येथे महिला बचत गटांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पेपर प्लेट व द्रोण निर्मिती प्रशिक्षणादरम्यान पिण्याच्या व वापराच्या पाण्याची कमतरता प्रकर्षाने जाणवली. जेवणानंतर भांडी धुण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याने अनेक महिलांनी पत्रावळी घरी नेऊन त्यांची विल्हेवाट लावण्याचा पर्याय स्वीकारला. स्फूर्ती क्लस्टर अंतर्गत नगरपरिषद चिखलदरा आणि खादी ग्रामोद्योग आयोगाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी हँडमेड पेपर व द्रोण-पत्रावळी निर्मितीचे विनामूल्य प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाचे समन्वयक सुनील भालेराव असून, महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा या योजनेचा उद्देश आहे.खादी ग्रामोद्योग आयोग, नागपूर यांच्या माध्यमातून सुमारे दहा लाख रुपये किमतीच्या आठ सेमी-ऑटोमॅटिक मशिनरी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मशिनरीच्या सहाय्याने कच्च्या मालापासून पत्रावळी व द्रोण तयार करण्याचे प्रशिक्षण नगरपरिषद चिखलदरा येथील पर्यटन संकुलात दिले जात आहे.प्रशिक्षणासाठी सुमारे ५० महिलांनी नोंदणी केली असून, उद्योग उभारणीसाठी आवश्यक बीजभांडवल, कच्चा माल खरेदी आणि उत्पादन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. उद्घाटनप्रसंगी खादी ग्रामोद्योग आयोगाचे कार्यवाहक भावेश सहारे यांनी प्रशिक्षणाचे उद्घाटन केले. नगरपरिषद बचत गट समन्वयक राजेश आटवर्धन यांनी प्रास्ताविक करत मशिनरीचे इंस्टॉलेशन, विद्युत जोडणी व कार्यपद्धतीची माहिती दिली.केव्हीआयसीच्या मास्टर ट्रेनर अक्षिता भावे यांनी महिलांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. कार्यक्रमाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी नरेंद्र म्हांसांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रशिक्षणार्थींसाठी चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली असून, हे प्रशिक्षण ११ ते १६ जून २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. मात्र, रोजगारनिर्मितीच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात पाणीटंचाईची समस्या प्रकर्षाने समोर आल्याने महिलांमध्ये नाराजीचे वातावरण दिसून आले. आयोजकांनी अधिकाधिक महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# उद्धव ठाकरेंची शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार

## रवी राणांचा मोठा दावा, राष्ट्रवादीबाबतही मोठं वक्तव्य; शशिकांत शिंदेंचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती/मुंबई**
राज्यात विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच महाविकास आघाडीतील संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चांना नवं वळण मिळालं आहे. अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे दोन्ही पक्ष लवकरच काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचा दावा केला आहे.अमरावतीत माध्यमांशी बोलताना रवी राणा म्हणाले की, शरद पवार यांनी काँग्रेसमध्ये परत जाण्याची इच्छा व्यक्त केली असून त्यासंदर्भातील प्रस्तावही दिला गेला आहे. या प्रस्तावावर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी विचार करत असल्याचा दावाही त्यांनी केला. याचबरोबर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेबाबतही त्यांनी भाष्य करत, संजय राऊत



हे वारंवार दिल्लीतील १० जनपथवर जात असून क ा ँ ग ्र े स स ा े ब त विलिनीकरणासाठीच हालचाली सुरू असल्याचा टोला लगावला.

**शशिकांत शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर–** मात्र रवी राणांच्या या दाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. विलिनीकरणाच्या चर्चा पूर्णपणे फेटाळून लावत त्यांनी काँग्रेस नेते नाना पटोले यांच्यावर निशाणा साधला. नाना पटोले यांनी आधी काँग्रेसची मूठ बांधावी आणि स्वतःचा पक्ष मजबूत करावा. राष्ट्रवादीची काळजी करण्याची त्यांना गरज नाही, असे शिंदे म्हणाले.

दरम्यान, विधानपरिषद निवडणुकीत काही ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी माघार घेतल्याने महायुतीच्या सहा जागा बिनविरोध झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर रवी राणांनी काँग्रेसवरही टीका करत, राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसला दुसऱ्यांना पाठिंबा द्यावा लागत आहे, ही नामुष्कीची बाब आहे, असा टोला लगावला. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीच्या धामधुमीत विलिनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा एकदा राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

# २०० पोते सोयाबीन घेऊन ट्रकचालक फरार

## व्यापाऱ्याची ९३ लाखाने केली फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती–** येथील बाजार समितीतून एका व्यापाऱ्याने खरेदी केलेले २०० क्विंटल सोयाबीन घेऊन निघालेला ट्रक सोलापूरला पोहचलाच नाही. – हा माल ट्रकचालकानेच गायब – केल्याचा संशय असल्यामुळे व्यापाऱ्याने गाडगेनगर पोलिसात तक्रार दिली. तक्रारीवरून ट्रकचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणातील तक्रारदार मनीष सतीश भट्टड (३७, रा. धामणगाव रेल्वे) यांनी येथील बाजारसमितीमधील पाच अडत व्यापाऱ्यांकडून ६ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल दराने एकूण २०० क्विंटल सोयाबीन खरेदी केले. त्यांना हा शेतमाल ऑर्डप्रमाणे सोलापूर येथील कंपनीला पाठवायचा होता. ट्रक रवाना होण्यापूर्वी भट्टड यांनी चालकाला त्याचे नाव आणि मोबाइल क्रमांक विचारला होता. त्यावर चालकाने आपले नाव सांगून मोबाइल क्रमांक दिला. त्यानंतर भट्टड हे धामणगाव रेल्वेला निघून गेले. दरम्यान, ७ जूनरोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास ट्रक कुठपर्यंत पोहोचला, हे पाहण्यासाठी भट्टड यांनी ट्रकचालकाच्या मोबाइलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाचा मोबाइल बंद येत होता. त्यामुळे त्यांनी तातडीने सोलापूर येथील संबंधित कंपनीशी संपर्क साधून चौकशी केली. तेव्हा तिथे शेतमाल पोहोचलाच नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे आणि ट्रकचालकानेच माल लांबविल्याचे लक्षात आल्यावर भट्टड यांनी गाडगेनगर ठाण्यात तक्रार दाखल केली.–

# विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्याकडून विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरला अमरावती महसूल विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी सेंटरमधील विविध स्टार्टअप उपक्रमांची बारकाईने पाहणी केली आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

याप्रसंगी कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागाचे उपायुक्त द.ल. ठाकरे, उपविभागीय आयुक्त संजय जाधव, विद्यापीठाचे कुलसचिव अविनाश असनारे आणि इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख तथा संचालक प्रा.स्वाती शेरेकर प्रामुख्याने उपस्थित



होत्या. विभागीय आयुक्तांनी इन्क्युबेशन सेंटरच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती घेतली. सेंटरमध्ये नवउद्योजकांची होणारी निवड प्रक्रिया, त्यांना दिल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच आर्थिक व तांत्रिक सहाय्याविषयी त्यांनी जाणून घेतले. स्टार्टअप्सच्या प्रगतीचा आढावा घेत त्यांनी भविष्यातील संधी, विस्ताराच्या शक्यता आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.याच कार्यक्रमाचे औचित्य साधून 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'तर्गत निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या हस्ते रुजू आदेशांचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

### प्रभावीपणे राबवणारे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले

अत्यंत प्रभावीपणे राबवणारे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ यावेळी ठरले आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव, कौशल्य विकास आणि रोजगारक्षमतेत वाढ करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

समन्वय अधिक दृढ होण्यास मदत स्टार्टअप परिसंस्थेला मिळाले बळ इन्क्युबेशन सेंटरच्या दर्जेदार कार्यामुळे प्रांतातील उद्योजकता, कौशल्य विकास आणि स्टार्टअप परिसंस्थेला अधिक बळ मिळेल. अशा भेटींमुळे उद्योग, शिक्षण आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होईल.

**नयना गुंडे, विभागीय आयुक्त, अमरावती।**

# मान्सून २० जूनला येण्याची शक्यता तज्ज्ञांचा अंदाज २४ तासांत शहराच्या तापमानात २.६ अंशाची वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**
जिल्ह्यातील, शेतकरी मान्सूनची आतुरतेने वाट बघत असताना सध्या जिल्ह्यात विखुरलेल्या स्थितीत मान्सूनपूर्व वादळी पाऊस व गारपीटीचे तांडव सुरू आहे. सोमवारी ८ रोजी वादळी पावसाने अमरावती शहराला जबर तडाखा दिला, त्यानंतर शहर व परिसरात पाऊसच झाला नसल्यामुळे कमाल तापमानात सातत्याने वाढ होत असून शुक्रवार १२ रोजी ४२.२ अंश सेल्सियस तर किमान २५७ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. कमाल तापमान २४ तासांत २.६ अंश सेल्सियसने वाढल्यामुळे दुपारी



चांगलाच उकाडा जाणवत होता तसेच उन्हात अंगाला चटके बसत होते. अशात २० जूनपर्यंत जिल्ह्यात मान्सूनचे आगमन होण्याची आशा हवामान खात्यासह हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आणखी सुमारे ८ दिवसपावसाची प्रतिक्षा करावी लागणार आहे. येत्या काही दिवसांत जिल्ह्यात तुरळक वादळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. सध्या मान्सून हरनयी (कोकण), सोलापूर (दक्षिण महाराष्ट्र), हैदराबाद, चेन्नई, पश्चिम बंगाल पर्यंत पोहोचला आहे.

हलक्या पावसाची शक्यता नाकारता येणार नाहीजिल्ह्यात मान्सूनच्याआगमनाबाबत निश्चित तारीख सध्या तरी सांगता येणार नाही.जिल्ह्यात मान्सूनच्या आगमनाबाबत निश्चित तारीख सध्या तरी सांगता येणार नाही. परंतु, तो २० तारखेच्या आसपास येण्याची आशा आहे. १४ ते १७ जून या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या पाक्साची शक्यता नाकारता येणार नाही. प्रा. अनिल बंड, हवामानतज्ज्ञ, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय.

# खरीपपूर्वी शेतकऱ्यांना मोठा झटका! खतांच्या दरात मोठी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती –** खरीप हंगामाची तयारी अंतिम टप्प्यात असताना रासायनिक खतांच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीमुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. बियाणे, मजुरी, औषधे आणि इंधनाच्या वाढत्या खर्चामुळे आधीच आर्थिक ताण सहन करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता खतांच्या वाढलेल्या किमतीचे नवे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढणार असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनावर होत आहे. सध्या शेतकरी खरिप पेरणीच्या नियोजनाने चिंताग्रस्त झाला आहे. याबात मिळालेली माहिती अशी की, विविध खतांच्या दरात लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. १५:१५:१५ या खताचा जुना दर एक हजार ६५० रुपये होता, तो आता २ हजार ५० रुपये करण्यात आला आहे. १०:२६:२६ या खताचा दर एक हजार ९०० रुपयांवरून २ हजार २५० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. त्याचप्रमाणे १२:३२:१६ या खताचा दर २ हजार २५ रुपयांवरून २ हजार ४०० रुपये करण्यात आला आहे.

## DAP युरियाच्या तुटवड्याने चिंता वाढली

२०:२०:०:१३ या खताचा दर १ हजार ४५० रुपयांवरून थेट २ हजार २०० रुपये करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, डीएपी आणि युरिया या खतांच्या किमतीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नसली तरी या खतांचा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र आहे. अनेक कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांना डीएपी आणि युरिया उपलब्ध होत नसल्याने त्यांना इतर महागडी खते खरेदी करण्याची वेळ येत आहे. परिणामी, शेतकऱ्यांचा खर्च वाढत असून खरीप हंगामाचे नियोजन कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय जिल्ह्यातील काही कृषी सेवा केंद्रांमध्ये जुन्या साठ्यातील खते नव्याने वाढलेल्या दराने विकली जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. जर या तक्रारींमध्ये तथ्य



आढळून आले, तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने चौकशी करून खत विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

खरीप हंगाम हा शेतकऱ्यांसाठी वर्षातील सर्वांत महत्त्वाचा कालावधी मानला जातो. अशा वेळी खतांची उपलब्धता व परवडणारे दर हे शेती उत्पादनासाठी अत्यावश्यक असतात. मात्र वाढत्या किमती आणि तुटवड्यामुळे शेतकरी दुहेरी संकटाचा सामना करत आहे. एका बाजूला पावसाच्या अनिश्चिततेची चिंता, तर दुसऱ्या बाजूला वाढलेला शेती खर्च यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याबरोबरच दरवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. तसेच कृषी विभागाने जिल्ह्यातील खत विक्रेत्यांवर नियमित तपासणी मोहीम राबवून जुन्या साठ्याची नव्या दराने विक्री होत नाही ना, याची खातरजमा करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


### सोयाबीन बियाणाचेही दर वाढले

बाजारात सध्या सोयाबीन बियाणाचे दर वाढले आहेत. तर नामवंत कंपण्याचे बियाणे मिळणे दुरापास्त झाले आहे. महाबीज कंपनीने वेगवेगळे वाण बाजारत आणले तरी शेतकऱ्यांनी विविध बियाणाची खात्री करून व पक्की पावती घेऊन खरेदी करण्याचे अवाहन कृषी विभागाने केले आहे. खताचा तुटवडा निर्माण करून चढ्या भावाने विक्री करणाऱ्यावर कारवाईचा इशारा दिला आहे.–

# बिबट्याच्या कातडीचा तुकडा बाळगणाऱ्या तीन आरोपींना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती,** गुगामल वन्यजीव विभागांतर्गत वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्ष, हरिसाल वनपरिक्षेत्रातील वन कर्मचारी तसेच स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त कारवाईत बिबट्याच्या कातडीचा तुकडा बेकायदेशीर रीत्या बाळगणाऱ्या तीन आरोपींना अटक करण्यात आली.सदर कारवाईदरम्यान आरोपीकडून बिबट्याच्या कातडीचा एक तुकडा जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्यांमध्ये मांगीलाल किशोरी इवणे (वय ४५ वर्ष), रा. चिरा, जि. बैतुल (म.प्र.), पोलीस स्टेशन दामजीपुरा, दिपक बाबुलाल उईके (वय २५ वर्षे), रा. ढालगाव, जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन रोशनी. कमल रतन ठाकूर (वय ३१



वर्ष), रा. धामा गोलाई, जि. खंडवा (म.प्र.), पोलीस स्टेशन –रोशनी यांचा समावेश आहे.या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास गुगामल वन्यजीव विभागामार्फत सुरू असून, जप्त करण्यात आलेल्या बिबट्याच्या कातडीचा उगम, त्यामागील संभाव्य वन्यजीव गुन्हेगारी साखळी, तसेच इतर संबंधित व्यक्तीचा सहभाग याबाबत सखोल चौकशी करण्यात येत आहे.सदर कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी शुभांगी राऊत, दिनेश केंद्रे, स्वप्नील राऊत, मुकेश जावरकर, अनंता नायसे, हरिसाल वनपरिक्षेत्रातील राजेश धुमाळे, मनिषा भुसुम, ज्योती धिकार तसेच वन्यजीव प्रेमी चेतन भारती यांच्या सहभागाने पार पडली.वन्यजीवांच्या अवयवांची बेकायदेशीर शिकार, वाहतूक, व्यापार किंवा ताबा हा गंभीर व दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही संशयास्पद हालचालींची माहिती नागरिकांनी तात्काळ वन विभागास द्यावी, असे आवाहन गुगामल वन्यजीव विभागामार्फत करण्यात आले आहे.

# शासकीय वसतिगृह प्रवेश जाहिरातीत एससी प्रवर्गाची विभागणी; राज्यात उपवर्गीकरण लागू?

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.१३नागपूर :**

राज्यात अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील उपवर्गीकरणाचा मुद्दा चर्चेत असतानाच समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेश जाहिरातीत अनुसूचित जातींच्या काही घटकांचा स्वतंत्र उल्लेख करण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे.

जाहिरातीत ‘मांग’, ‘मेहतर’ आणि ‘इतर एससी’ अशा स्वरूपात जागांचे विभाजन करण्यात आल्याबद्दल विविध संघटनांनी तीव्र आक्षेप घेत प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्तांकडे निषेधाचे निवेदन सादर केले आहे. दरम्यान, प्रशासनाने या जाहिरातीमध्ये कोणतीही त्रुटी नसल्याचा दावा करत संबंधित शासन निर्णयानुसारच ही प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभ, तसेच इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी शालेय विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत अर्ज करता येणार असून, इयत्ता अकरावी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

मात्र, प्रवेशासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीत अनुसूचित जाती प्रवर्गातील जागांचे ‘मांग’, ‘मेहतर’ आणि ‘इतर एससी’ अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात आल्याने युवा ग्रॅज्युएट फोरमने यावर आक्षेप नोंदवला आहे. या संदर्भात संबंधित निर्णयाचा




कायदेशीर आधार आणि शासन आदेश सार्वजनिक करण्यात यावेत, तसेच संबंधित अधिकारी आणि विभागाकडून स्पष्टीकरण मागवून जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

युवा ग्रॅज्युएट फोरमचे अतुल खोब्रागडे यांनी सांगितले की, ’भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना एकत्रित संवैधानिक संरक्षण दिलेले असताना अशा प्रकारची जातनिहाय विभागणी सामाजिक ऐक्याला धक्का देणारी ठरू शकते.’

दुसरीकडे, प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्त प्रसाद कुलकर्णी आणि सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी जाहिरातीत कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, १९८४, २०१४ आणि २०२५ मधील शासन निर्णयांनुसार अनेक वर्षांपासून याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून, मागील वर्षीही अशाच स्वरूपाची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. नव्या शैक्षणिक सत्रासाठीची ही नियमित प्रक्रिया आहे.

# यवतमाळात १०७.५५ मे. टन अनधिकृत खत जप्त

## ओम ग्रो ऑर्गेनिक्सच्या बेकायदेशीर कारखान्यावर छापा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३यवतमाळ–** येथील भोयर औद्योगिक क्षेत्र परिसरात एका अनधिकृत खत उत्पादन कारखान्यावर कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा अत्यंत गोपनीयतेने छापा टाकून तब्बल २४ लाख ७३ हजार ४५० रुपये किमतीचा एकूण १०७.५५ मे. टन (२,१५१ बॅग) बेकायदेशीर रासायनिक व सेंद्रिय खतांचा साठा हस्तगत करण्यात पथकाला यश आले आहे. याप्रकरणी लोहारा (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, खत क्षेत्रातील या मोठ्या गैरव्यवहारामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



**गोपनीय माहितीच्या आधारे छापा–** कृषी आयुक्तालय पुणे, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय अमरावती आणि यवतमाळ जिल्हा कृषी विभागाच्या संयुक्त पथकाला भोयर एम.आय.डी.सी. भागात परवान्याशिवाय खतांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि साठवणूक केली जात असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा भोयर एम.आय.डी.सी. मधील प्लॉट नं. ५३/१, जीनियस पॉवर कंपनीच्या पाठीमागे असलेल्या शेडवर अचानक छापा टाकला.

‘मे. ओम ग्रो ऑर्गेनिक्स’ या कंपनीकडे केवळ ‘ए–७६ एमआयडीसी यवतमाळ’ या ठिकाणचा अधिकृत व्यवसाय परवाना असताना, आरोपींनी मुख्य परवानाधारक जागेव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची कायदेशीर परवानगी नसलेल्या ठिकाणी (प्लॉट नं. ५३/१ च्या मागे) बेकायदेशीररीत्या खतांचे उत्पादन आणि साठवणुकीचा गोरखधंदा थाटल्याचे तपासात निष्पन्न झाले.

कारवाईदरम्यान घटनास्थळावरून वेगवेगळ्या प्रकारच्या अनधिकृत खतांनी भरलेल्या एकूण २,१५१ गोण्या जप्त करण्यात आल्या आहेत. या जप्त केलेल्या खतांचे एकूण वजन १०७.५५ मेट्रिक टन असून त्याची बाजारभावानुसार किंमत २४ लाख ७३ हजार ४५० रुपये इतकी आहे. या प्रकरणी खत निरीक्षक तथा यवतमाळ पंचायत समितीचे कृषी अधिकारी संजय पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी मे. ओम ग्रो ऑर्गेनिक्सचा मालक गजानन सुरेश तोटे (५१, रा. यवतमाळ), अविनाश वसंत दुधे (३८) आणि जशवंत सिंग गिल (५०) या तिघांना आरोपी केले असून त्यांच्यावर फसवणुकीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## नगरसेवकाशी गैरवर्तन प्रकरणी

# महावितरणच्या सहाय्यक लेखापालाचे निलंबन

## विजबिल माहिती विचारणाऱ्या नगरसेवकाला शिवीगाळ केल्याचा आरोप; ध्वनिफितीच्या आधारे कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती :** महावितरणच्या इठ शहर उपविभागातील सहाय्यक लेखापाल श्री शिवचरण बालम भोसले यांना नगरसेवकाशी कथित गैरवर्तन आणि अर्वाच्य भाषेचा वापर केल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता तथा सक्षम अधिकारी राजेश घाटोळे यांनी हा आदेश जारी केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भोसले हे ५ जुलै २०२३ पासून शहर उपविभागात कार्यरत आहेत. १० जून २०२६ रोजी सकाळी नगरसेवक संजय रामकृष्ण गव्हाळे यांनी विजबिलासंदर्भातील माहिती जाणून घेण्यासाठी भोसले यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला होता.

यावेळी भोसले यांनी उद्धटपणे वर्तन करत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याची तक्रार करण्यात आली. या संभाषणाची ध्वनिफीतही संबंधितांनी कार्यालयात सादर केली आहे.महावितरण प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेत, संबंधित कर्मचाऱ्याचे वर्तन कंपनीच्या प्रतिमेला बाधा पोहोचविणारे असल्याचे नमूद केले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत




वितरण कंपनी कर्मचारी सेवाविनियम–२००५ मधील तरतुदींनुसार हे कृत्य गंभीर स्वरूपाचे मानण्यात आले असून सेवाविनियम क्रमांक ८८(क) अंतर्गत भोसले यांना पुढील आदेशापर्यंत निलंबित करण्यात आले आहे.निलंबन काळात त्यांना आठवड्यातील सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी इठ शहर उपविभाग क्र.१ कार्यालयात हजेरी लावावी लागणार आहे. तसेच मूळ वेतनाच्या २० टक्के प्रमाणे निलंबन भत्ता व नियमानुसार इतर भत्ते मिळणार असून, पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे.

# ‘एलईडी हेडलाइट’ ने अनेकांचे जीव चालले; ‘आरटीओ’ कारवाई करणार तरी कधी?

## फॅन्सी, हेडलाइट्सचे फॅड वाढले : डोळ्यांसमोर अंधारी व क्षणिक अंधत्व येतो

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ अमरावती**

दुचाकी अथवा चारचाकी वाहनांत नियमबाह्य प्रोजेक्टर लाइट, एलईडी–एचआयडी हेडलाइट व मॉडिफाइड हायबीम हेडलाइट्स बसवण्याचा ट्रेंड वाढला आहे. यामुळे रात्रीच्या वेळी वाहनांच्या तीव्र



प्रकाशामुळे समोरून चालकांच्या डोळ्यांसमोर अंधारी येणे, क्षणिक अंधत्व येऊन वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात घडत आहेत. विशेष म्हणजे, हेडलाइट्सच्या प्रकाशाची तीव्रता मोजायला आरटीओकडे यंत्रणाच नाही.अनेक वाहनधारक मूळ कंपनीचे दिवे काढून बाजारातून अधिक तीव्रतेचे रंगीत किंवा पांढरे दिवे बसवून घेत आहेत. विशेषतः तरुणांमध्ये वाहनाचा लूक बदलण्यासाठी असे नियमबाह्य बदल करण्याची स्पर्धा लागली आहे.

केंद्रीय मोटार वाहन कायद्यानुसार वाहनांमध्ये मूळ कंपनीच्या रचनेत बदल करून अतिरिक्त किंवा तीव्र क्षमतेचे दिवे लावणे गुन्हा आहे. मात्र, तरीही गैरप्रकार होत असताना सुध्दा वाहतूक शाखेकडून दुर्लक्ष होताना दिसत आहे.रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनाचा तीव्र एलईडी फ्लॅश थेट डोळ्यांवर पडल्याने चालकांचे डोळे पूर्णपणे दीपून जातात. या प्रखर प्रकाशामुळे पुढील काही सेकंदांसाठी चालकाला समोरचा रस्ता, वळण किंवा पादचारी अजिबात दिसत नाहीत. या क्षणिक अंधत्वामुळे वाहनावरील नियंत्रण सुटते व गंभीर अपघात घडत आहेत.

### पूर्वीचे हॅलोजन गेले, जीवघेणे एलईडी आले

पूर्वी सर्व वाहनांना पिवळसर प्रकाश देणारे फॅक्टरी–फिटेड हॅलोजन दिवे असायचे, ज्यांचा प्रकाश डोळ्यांना त्रासदायक ठरत नसे. मात्र, आता त्यांची जागा अत्यंत पांढरा आणि प्रखर प्रकाश फेकणाऱ्या एलईडी आणि एचआयडी दिव्यांनी घेतली आहे. हे आधुनिक दिवे समोरच्या चालकाची दृष्टी पूर्णपणे बाधित करतात.

### ’अप्पर–डिप्पर’चा विसर

रात्रीच्या वेळी वाहन चालवितांना समोरून वाहन येत असताना आपल्या हेडलाइटचा प्रकाश खाली करणे (डिप्पर देणे) हा वाहन चालवण्याचा मूलभूत नियम आहे. मात्र, वाहनधारकांना या ’अप्पर डिप्पर’च्या वापराचा पूर्णपणे विसर पडला आहे.

# निधीअभावी मेळघाट मधील कामे रखडली

## जिल्हा परिषदेला शासनाच्या १८ कोटींची प्रतीक्षा : कंत्राटदारही वैतागले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** मेळघाटातील नऊ गावांमध्ये २० टँकरने पाणीपुरवठा केला जात असतानाच जलजीवनची ४७ गावांतील कामे थांबल्याने पाण्याचा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. या कामांसाठी केंद्र शासनाचा १५, तर राज्य शासनाचा ३ असा एकूण १८ कोटींचा निधी हवा आहे. परंतु वारंवार पाठपुरावा करूनही यंत्रणाही हतबल झाले आहेत. परिणामी निधीअभावी पाणीपुरवठा योजनेची कामे थांबली आहेत. ज्या गावांमध्ये जलजीवनची कामे थांबली, त्या गावांचे जलसंकट अधिक गडद झाले आहे.

गावात पाण्याचा स्रोत नसल्यामुळे त्यांना दूरवरून पाणी आणावे लागत आहे. त्यासाठी मोठी पायपीट होत आहे. हाती आलेल्या माहितीनुसार जिल्ह्यातील




निम्म्याहून अधिक गावांत जलजीवन अंतर्गत ६६६ कामे सुरू आहेत. या कामांवर २६२ कोटी ८ लाख ८१ हजार खर्च केले जात आहेत. यापैकी आजपर्यंत ६०७ कामे पूर्णत्वास गेली असून, उर्वरित ५९ कामे थांबली आहेत. यामध्ये अलीकडेच सुरू केलेली; परंतु निधीअभावी थांबलेली नऊ, २५ ते ५० टक्के पूर्ण झालेली साठ, पन्नास ते पंचाहत्तर टक्के पूर्णत्वास गेलेली सहा आणि ९५ टक्क्यांवर अडकलेली २४ कामे आहेत. या कामांच्या माध्यमातून ४६ पैकी काही गावांत नव्या नळयोजना, तर काही गावांत नळयोजनांची दुरुस्ती केली जाणार होती; परंतु निधीच्या अभावामुळे संपूर्ण प्रक्रियेलाच ब्रेक लागला आहे.

या गावांतील कामे थांबलीत चिखलदरा तालुक्यातील सर्वाधिक १९, धारणी तालुक्यातील ८, धामणगाव रेल्वे, तिवसा व चांदूर बाजार तालुक्यातील प्रत्येकी चार, नांदगाव खंडेश्वर व अमरावती तालुक्यातील प्रत्येकी तीन आणि भातकुली व चांदूर रेल्वे तालुक्यातील प्रत्येकी एका गावाचा कामे थांबण्यात समावेश आहे. या ४७ गावांमध्ये जलजीवनच्या ५९ योजना हाती घेण्यात आल्या होत्या; परंतु निधीअभावी सध्या त्या रखडल्या आहेत.

# नवीन अभ्यासक्रमासाठी शिक्षक सज्ज; १० जुलैपर्यंत प्रशिक्षण पूर्ण होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती :**राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचा नवीन अभ्यासक्रम यंदापासून लागू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या हातात नव्या पाठ्यपुस्तकांचा संच पोहोचत असताना हा अभ्यासक्रम प्रभावीपणे शिकविण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी)ने विशेष नियोजन केले आहे. सर्व स्तरांवरील प्रशिक्षण १० जुलैपर्यंत पूर्ण करण्याचा मानस परिषदेने व्यक्त केला आहे.जनगणनेच्या कामात शिक्षकांचा सहभाग असल्याने प्रशिक्षणाचे पूर्वनियोजित वेळापत्रक पुढे ढकलावे लागले होते. यामुळे एससीईआरटीच्या सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी नव्याने प्रशिक्षणाचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या शिक्षकांचे राज्यस्तरीय प्रशिक्षण पूर्ण झाले असून सहावीच्या शिक्षकांचे प्रशिक्षण अद्याप बाकी आहे.इयत्ता सहावीसाठी मराठी माध्यमातील २४४ आणि उर्दू माध्यमातील २४० राज्यस्तरीय प्रशिक्षक अपेक्षित असून त्यांची माहिती १५ जूनपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रशिक्षणामध्ये जिल्ह्यातील विशेष शिक्षक, साधन व्यक्ती, अनुभवी शिक्षक, व्याख्याते, पर्यवेक्षकीय अधिकारी तसेच अभ्यासक्रम निर्मितीत सहभागी तज्ज्ञांचा समावेश करण्यावर भर देण्यात आला आहे.वेळापत्रकानुसार इयत्ता सहावीच्या शिक्षकांसाठी १७ व १८ जून रोजी पूर्वतयारी कार्यशाळा, २२ ते २५ जूनदरम्यान राज्यस्तरीय, २९ जून ते २ जुलै जिल्हास्तरीय आणि ४ ते १० जुलैदरम्यान तालुकास्तरीय प्रशिक्षण होणार आहे. इयत्ता दुसरीच्या शिक्षकांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण १८ ते ३० जून व तालुकास्तरीय प्रशिक्षण २२ जून ते २ जुलैदरम्यान होईल. तर तिसरी व चौथीच्या शिक्षकांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण १८ ते ३० जून आणि तालुकास्तरीय प्रशिक्षण २४ जून ते ४ जुलैदरम्यान आयोजित करण्यात आले आहे.या संपूर्ण प्रशिक्षण प्रक्रियेची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# आ.राणांच्या कार्यालयात पालकमंत्री बावनकुळें समोर युवा स्वाभिमान च्या नगरसेवकांचा ओळख परिचय

## १० मिनिटे चार नेत्यांमध्ये बंद द्वार चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती** जिल्ह्याचे अमरावती, १२ जून पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्र वारला रात्री आमदार रवी राणा व नवनीत राणा यांच्या शंकरनगर निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. येत्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानल्या जात आहे. गुरुवारला भाजपचे विधान परीषद निवडणुकीचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी आ.राणांच्या कार्यालयात भेट घेतली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ना. बावनकुळे यांनी आ. राणांच्या निवासस्थानी भेट घेतली.



यावेळी आ. रवी राणा– नवनीत राणा व सुनील राणा यांनी त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यानंतर पालकमंत्री बावनकुळे , आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा व सुनील राणा यांची दहा ते पंधरा मिनिटे – बंदव्दार चर्चा झाली.त्यानंतर स्वाभिमानीच्या नगरसेवकांचा ओळख परिचय करण्यात आला. यावेळी आ. प्रवीण तायडे, भाजपा नगरसेवक ऋषिकेश देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, शिक्षण सभापतीॲड. प्रिती रेवणे, प्रशांत वानखडे, महेश मुलचंदानी, नंदा सावदे, डॉ. मधुरा कहाळे, प्रियंका पाटणे, अर्चना पांडे, योगेश विजकर, सुमती ढोके, मिरा कांबळे, अजय जयस्वाल, गौरी मेघवानी, रजनी डोंगरे, किशोर जाधव,, विनोद जायलवाल, विनोद गुहे, अवी काळे, नितीन बोरेकर, हर्षल रेवणे, उमेश ढोणे, वैभव बजाज, सुनील काळे, सुनील खराटे आदी उपस्थित होते.